पोलीस अधीक्षक कार्यालय, सांगली.
सांगली -मिरज रोड, विश्रामबाग, सांगली - ४१६ ४१५
फोन नं.- ०२३३ २६७२३२३ फॅक्स नं. – ०२३३ - २६७२१००
E Mail- sp.sangli@mahapolice.gov.in

क्रमांक-पशा-५/क्रेन जाहिरात/२०२६ /8186 सांगली दि.२६ /११/२०२६

क्रेन वापरण्यासंबंधी मार्गदर्शक तत्वे/सुचना/अटी खालीलप्रमाणे आहे.

०१. क्रेन वाहन एक चालक चालविल काही अपरिहार्य केसेसमध्ये दोन चालकासह परवानगी देण्यात येईल.तसेच क्रेन चालकाकडे क्रेन वाहन चालविण्यासाठी ड्रायव्हिंग लायसन्स असले पाहिजे व बदली चालकाला सुद्धा हा नियम लागू राहील.

०२. क्रेन वाहनांचे संपूर्ण कागदपत्र (उदा. रजिस्ट्रेशन,पीयूसी,इन्श्युरन्स,फिटनेस,इ.) वेळोवेळी परीपूर्ण केलेले असावेत.

०३. क्रेन वाहनावरील कर्तव्यावर असलेले कर्मचारी हे निटनेटक्या व निळ्या रंगाच्या स्वच्छ गणवेशात हजर राहतील व त्यांची वयोमर्यादा १८ वर्षे पुर्ण असावी.

०४. क्रेन वाहन चालकास कमीतकमी तीन वर्षे गाडी चालविण्याचा अनुभव असावा. अशा चालकाकडे एल.एम.व्ही/ व्यावसायिक/मालवाहतूक (ट्रान्सपोर्ट)/आरटीओ मान्यताप्राप्त वाहनचालक परवाना असणे आवश्यक आहे.

०५. क्रेन वाहन मालकाने सदर वाहनांच्या अनुषंगाने सर्व प्रकारचे कर भरलेले असावेत शिवाय पॅन कार्ड व आयकर भरलेबाबत विवरणपत्र संबंधित वाहतूक शखेला सादर करावेत.

०६. टोईंग पावती पुस्तक वाहतुक शाखेकडून प्रमाणित करून घेण्यात यावी.

०७. क्रेन वाहनांचे दिवे सुस्थितीत असावेत.

०८. क्रेनवर कोणत्याही संस्थेचे अथवा बँकेचे कर्ज असल्यास त्याला वाहतूक शाखा जबाबदार रहाणार नाही.

०९. क्रेन मध्ये कोणताही तांत्रिक बिघाड असता कामा नये.तांत्रिक बाबी योग्य असले पाहिजेत.क्रेनला उठून दिसेल किंवा एखाद्या व्यक्तीला चटकन ओळखता येईल अशा रितीने क्रेनला निशान किंवा झेंडा लावला पाहिजे.

१०. क्रेनमधील बिघाड अथवा क्रेनवरील स्थगीती ही आठ दिवसांपेक्षा जास्त असता कामा नये.

११. संबंधित पोलीस अधिकारी वाहतूक शाखा सांगली हे सांगतील त्या त्या ठिकाणी काम करावे लागेल.

१२. क्रेनचे वाहन हे सुस्थितीत असले पाहिजे.क्रेन सोबत कायमपणे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडील कागदपत्र अद्यावत असणे आवश्यक आह.

१३. क्रेन वाहन माहकाने वाहनावरील कर्मचाऱ्यांना ओळखपत्र पुरविणे आवश्यक आहे.त्यावर प्रभारी पोलीस निरीक्षक वाहतूक नियंत्रण शाख हे प्रतिस्वाक्षरीने करतील.

१४. क्रेन सकाळी ८.०० ते रात्री २०.०० वा.पर्यंत वाहतूक नियंत्रण शाखेकडे काम करेल.तसेच महत्त्वाचे प्रसंगी बोलविले असता हजर रहावे लागेल.

Scanned with OKEN Scanner

१५. उचलण्यात येणा-या वाहनासाठी क्रेन चालकांना द्यावयाच्या रक्कमेबाबत शासन निर्णयाप्रमाणे विहीत करण्यात आलेल्या दरापेक्षा कमी दराची निविदा प्राप्त झाल्यास त्याचा विचार केला जाईल. तसेच विहित दरापेक्षा जादा दराची निविदा प्राप्त झाली तरी शासन नियमानुसार दर मंजूर करण्यात येईल.

१६. क्रेन चालक हा क्रेन वापरातील तज्ञ असावा. आवश्यकते प्रमाणे सज्ञान कामगार नेमून त्यांचा पगार क्रेन मालकांनी देण्याचाआहे. या कार्यालयाकडून पगार देण्यात येणार नाही तसेच कामगारांची पोलीस चारित्र्य पडताळणी झालेली असावी.

१७. क्रेन वाहनांची पुर्ण देखभाल क्रेन मालकांनी पाहणेची आहे. त्याबाबत कार्यालयाकडून कोणतेही आथिक तरतूद करण्यात येणार नाही. सदर क्रेन वाहनांस डिजीटल कॅमेरा व पब्लिक अनाऊस माईकची सोय असावी.

१८.आपणांकडून क्रेन वाहन संबंधित कार्यालयास अशिरा उपलब्ध झाल्यास अथवा नमूद केलेल्या अटीपैकी कोणतीही अटीचा भंग आपल्याकडून झाल्यास आपणास निर्गमित करण्यात आलेले आदेश रद्द करण्यात येइल.

१९. क्रेन वाहन अचानक नादूरूस्त झालेस पर्यायी वाहनांची तात्काळ सोय क्रेन मालकास करावी लागेल. क्रेनने वाहन उचलताना वाहनांचे नुकसान झालेस नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी क्रेन मालकाची राहिल.

२०.अति महत्वाचे बंदोबस्ताचे वेळी गाड्या काढण्यासाठी,क्रेनला काम नसेल त्यावेळी सदरचे बंदोबस्तासाठी क्रेनचा वापर केला जाईल व त्या कामाचे भाडे दिले जाणार नाही.

२१. क्रेन पुरवठा करार एक वर्ष कालावधीसाठी बंधनकारक असेल परंतू करारामधील अटी व शर्ती चे उल्लघन केलेस व क्रेन संदर्भातील कामकाजाची कामगिरी समाधानकारक नसल्यास आपणांस एक महिन्याची नोटीस देऊन क्रेन पुरवठा करारपत्र रद्द करून सुरक्षा ठेव रक्कम रुपये २५०००/-जप्त करण्यात येईल याची क्रेन मालकांनी कृपया नोंद घ्यावी.

२२. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर क्रेन मालक हे वाहतूक शाखेला करातील अटी मान्य असलेबाबत १००/- रु.स्टँप पेपरवर करार करून देतील.

२३. कोणतीही दरपत्रक स्वीकारणे अगर नाकारणे याचे सर्व हक्क तसेच वेळोवेळी बदल व सुधारणा करण्याचे हक्क तसेच सदरची प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, सांगली यांचेकडून राखून ठेवणेत आलेले आहेत.

२४. उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यास इच्छूक क्रेन मालकांनी दरपत्रक सादर करावेत. प्रामुख्याने सदर दरपत्रकामध्ये चारचाकी वाहने टोईग करणेबाबमचं दर नमूद करताना कोणत्याही प्रकारची खाडाखोड करु नये, अशा खाडाखोड व व्हाईटनर लावलेला असल्यास सदर दरपत्रक ग्राहय धरले जाणार नाही. यांची कृपया नोंद घ्यावी.

सदरचा क्रेन पुरवठा हा माहे नोव्हेंबर २०२६ ते सन नोव्हेंबर २०२७ या कालावधीसाठी बंधनकारक असेल.

पोलीस अधीक्षक
यांचे मान्यतेने

(सुहास देशमुख)
पोलीस उपअधीक्षक (मुख्या.)
पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली

e:\d drive backup 20.08.26\cb-5, sangli\crane\crane 2017-2018 four wheeler.docx

Scanned with OKEN Scanner

क्रेन मालकांना निवेदन

वाहतुक नियंत्रण शाखा,सांगली करिता नो-पार्कींग झोनमधील चारचाकी वाहने टोईंग करणेसाठी वाहतुक नियंत्रण शाखेमार्फत वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारी वाहने,अपघातातील वाहने,मध्येच बंद पडलेली वाहने इ.बाबत कारवाई करावी लागते. सदर कार्यवाहीसाठी (वाहने उचलणेसाठी) भाडेतत्त्वावर वाहतूक नियंत्रण शाखा,सांगली करिता २२५० किग्रॅ क्षमतेसह क्रेनची आवश्यकता आहे.

तरी वाहतूक नियंत्रण शाखा, सांगलीकरिता चारचाकी क्रेन पुरवठा करणेबाबतची दर नमूद केलेली निविदा व अनामत रक्कमेचा पोलीस अधीक्षक सांगली यांचे नावे रु.२५०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंचवीस हजार मात्र) धनाकर्ष (डी.डी.) व क्रेन वाहनाची कागदपत्रके, पुर्वी दिलेल्या सेवेच्या अनुभवाची माहिती तांत्रिक माहीती इत्यादी जाहिरात प्रसिद्ध झालेनंतर आठ दिवसापर्यंत पोहोचतील अशा बेताने पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली यांचेकडे सिलबंद लखोट्यामध्ये समक्ष अथवा टपालाने द्यावेत. तद्नंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी. क्रेन वापरण्यासंबंधी मार्गदर्शक तत्त्वे/सुचना व अटी सांगली पोलीस दलाचे संकेतस्थळावर (www.sanglipolice.gov.in) प्रसिद्ध केली आहे.

पोलीस अधीक्षक
यांच्या मान्यतेने

(सुहास देशमुख)
पोलीस उपअधीक्षक (मुख्या.)
पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली

Scanned with OKEN Scanner